# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/११९३० /२०२० दिनांक ०४/११/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य/पदव्युत्तर विभागाचे विभाग प्रमुख,
सर्व संलग्नीत महाविद्यालय व पदव्युत्तर विभागाचे विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :- 'दशमानोत्सव वर्ष' निमित्त कार्यक्रमाच्या तयारीकरीता आयोजित आभासी (Online) सभेस दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी उपस्थित राहण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने १० व्या वर्षात पदार्पण केल्या निमीत्त आगामी २०२०—२१ या वर्षभरात विविध कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रम/उपक्रमांची सुरूवात **दिनांक ०७/११/२०२०**रोजी होणार आहे. सदर उद्घाटनपर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे सन्माननीय कुलपती **मा. भगतसिंहजी कोश्यारी** हे मार्गदर्शन करणार असून विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष **मा. प्रा. डी.पी. सिंह** हे मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करतील. विद्यापीठाचे कुलगुरू **प्रा. श्रीनिवास वरखेडी** हे सुध्दा या प्रसंगी विद्यापीठाची भुमिका विषद करणार आहेत. गोंडवाना विद्यापीठाचे महत्वाचे शैक्षणिक घटक म्हणून आपण व आपले महाविद्यालयाने मोठी जबाबदारीची भुमिका आजपर्यंत निभावीलेली आहे. विद्यापीठाच्या दशमानोत्सव वर्ष आयोजनामध्ये आपली भुमिका अतिशय मोलाची असणार आहे.

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या निर्देशान्वये या कार्यक्रमाच्या तयारीकरीता विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांची आभासी (Online) सभा दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजीत केलेली आहे. तरी सदर कार्यक्रमाकरीता (webex link) दिलेल्या https://bit.ly/2l1zZQQ या लिंकवर आभासी (Online) सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनती.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली